**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११८८
२५६२ ११८९

**शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
इ—मेल : affiliation@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/२१९८

दिनांक : ३१/०८/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधित महाविद्यालये/
सर्व संबंधित मान्यता प्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/केंद्र

विषय : १. शैक्षणिक वर्ष २०२४— २०२५ करीता संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/केंद्रामधील मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांचे नूतनीकरण, स्थायी संलग्नीकरण/मान्यता व नैसर्गिकवाढ तसेच शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ करीता नवीन संशोधन केंद्र, संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थेतील नवीन संशोधन केंद्र, संशोधन केंद्रामध्ये नवीन विषय/अभ्यासक्रमांना मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत

२. **शैक्षणिक वर्ष २०२४ — २०२५ साठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थामध्ये नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेशक्षमता वाढ, विशेषस्तर विषय मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करण्याबाबत**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९, ११०, १११, ११४ व ११६ मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था/संशोधनसंस्था/केंद्र यामधील अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ करीता संलग्नीकरणाच्या/मान्यतेच्या नूतनीकरण, स्थायी संलग्नीकरण/मान्यता, नैसर्गिकवाढ तसेच शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ करीता नवीन संशोधन केंद्र/संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थेतील नवीन संशोधन केंद्र/अस्तित्वात असलेल्या संशोधन केंद्रामध्ये नवीन विषय/अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव तसेच शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ साठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थामध्ये नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेशक्षमता वाढ, विशेषस्तर विषय मान्यतेकरिता विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेत स्थळावरील BOD - BOD Online – Colleges/Institutes – Affiliation या लिंकवरून काळजीपूर्वक भरून सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी तसेच विहित शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांसह **खालील नमूद अटी व बाबी लक्षात घेवून अर्ज/प्रस्ताव <u>दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत</u>** या विभागाकडे जमा/अपलोड करावेत.

१) शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ साठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थामध्ये नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेशक्षमता वाढ, विशेषस्तर विषय मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे तथापि शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ साठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थांमध्ये नवीन पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेशक्षमता वाढ, विशेषस्तर विषय मान्यतेकरिताचे

प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ करिताची वार्षिक योजना माहेडच्या मान्यतेच्या अधिन राहून सादर करण्यात यावेत.

२) विद्यापीठाच्या आयटी सेलमार्फत सदर संचिका ऑनलाईन स्वरुपात जतन करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यामुळे जे प्रस्ताव शासन स्तरावर कार्यवाहीसाठी पाठवावे लागतात अशाच प्रस्तावांच्या संचिका सादर कराव्यात (उदा. नवीन विषय, अभ्यासक्रम, तुकडीवाढ इ.) तसेच संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/केंद्रामधील मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांचे नूतनीकरण, स्थायी संलग्नीकरण/मान्यता व नैसर्गिकवाढ त्यांचे ऑनलाईन रेकॉर्ड उपलब्ध आहे असे प्रस्ताव महाविद्यालयांनी प्रस्तुत विभागाकडे ऑफालाईन जमा करु नयेत तसेच ते प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करण्यात यावेत.

३) अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थामध्ये नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेशक्षमता वाढ, विशेषस्तर विषय मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करतांना अभ्यासक्रमांची निवड करतांना स्वायत्त महाविद्यालयांसाठी तयार केलेले अभ्यासक्रम फक्त स्वायत्त महाविद्यालयांनाच निवडता येतील त्याचप्रमाणे केवळ विद्यापीठ शैक्षणिक विभागांसाठी असणारे अभ्यासक्रम महाविद्यालयांना निवडता येणार नाहीत.

**(टिप : व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ करीता प्रस्ताव सादर करावेत.)**

आपला,

31/8/2023

(स. द. डाबखर)
उपकुलसचिव